## वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची सातवी बैठक दिनांक ०१.०८.२०२३ रोजी मा.श्री. एकनाथ डवले, अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा तथा प्रधान सचिव, मृद व जलसंधारण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीस खालील अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

श्री. वि. बा. नाथ, मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे तथा महासंचालक, वाल्मी, औरंगाबाद.
श्री. सुनील चव्हाण, आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे (व्ही. सी. द्वारे)
आयुक्त, मनरेगा, नागपुर (व्ही.सी. द्वारे)
श्री. सु. म. काळे, सह सचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
श्री. रविंद्र भोसले, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे
श्री. संतोष कराड, उप सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री. हे. गो. म्हापणकर, उपसचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
श्रीमती शुभांगी पोटे, अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
सहायक आयुक्त, मनरेगा, नागपुर (व्ही.सी. द्वारे)
श्री. ऋषि राज गोसकी, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतीनिधी (व्ही.सी. द्वारे)
श्री. विनायक इंगळे, कार्यसन अधिकारी, वने, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री. श्रीराम गवई, कार्यसन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री. ॲड. अमित गीते, अध्यक्ष, श्री एकलव्य सेवाभावी संस्था, परभणी.(व्ही.सी. द्वारे)
श्री. यशवंत पांडे, सचिव, अश्वमेघ ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, फत्तेपूर, जि.अमरावती.
उपसंचालक, फलोत्पादन (व्ही.सी. द्वारे)
वाल्मी, औरंगाबाद या संस्थेचे प्रतीनिधी (व्ही.सी. द्वारे)

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.३१ मे, २०२३ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | १. मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन शुद्धीपत्रक क्रं. केंपुयो २०२२/ प्र. क्र. १५/ जल-८ दि. ११ मे २०२३ अन्वये केलेल्या शासन शुद्धीपत्रकाबाबत चर्चा झाली.<br><br>२ . प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत<br>मे. एस २ एन्फोटेक इंटरनॅशनल लिमिटेड, मुंबई या संस्थेस कंत्राटी मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी सेवा पुरवठादार म्हणून केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेत आलेली आहे तथापि सदर संस्था शासनस्तरावरून रद्द करण्यात आले असल्याबाबत चर्चा झाली. | १. मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन शासन शुद्धीपत्रक क्रं. केंपुयो २०२२/ प्र. क्रं. १५/ जल-८ दि.११ मे २०२३ अन्वये केलेल्या शासन शुद्धीपत्रका बाबत पुन्हा अभ्यास करून पुढील SLNA बैठकीत सादर करणे बाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या.<br><br>२ .प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत<br>मे. एस २ एन्फोटेक इंटरनॅशनल लिमिटेड, मुंबई या संस्थेस कंत्राटी मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी सेवा पुरवठादार म्हणून केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेत आलेली होती. तथापि, सदर संस्था शासनस्तरावरून रद्द करण्यात आली असून पुढील कार्यवाही शासन स्तरावरून सुरु आहे. | मृद व जलसंधारण विभाग व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | ३. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत लेखांकन व लेखापरीक्षण या कामाकरिता सनदी लेखापाल नियुक्त करावयाच्या निविदा मसुद्यास मान्यता देणे. | ३. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत लेखांकन व लेखापरीक्षण या कामाकरिता सनदी लेखापाल नियुक्त करावयाच्या निविदा प्रक्रिया प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक १.० मध्ये अनुसरलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन पुढील बैठकीमध्ये मसुदा सादर करण्यात यावा, असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. | | |
| | | ४. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त/लेखा अधिकारी यांचे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट - विकास घटक २.० मध्ये वार्षिक कृती आराखड्या मधील बाबीस मंजूरी प्रदान करणे व वित्तीय प्राधिकार निश्चित करणे. | ४. वित्तीय प्राधिकर निश्चित करणेबाबतचा विषय हा आयत्यवेळेस अभ्यास न करता मांडला असल्याने दि.१६.१२.२०२२ च्या SLNA मध्ये या अनुषंगाने झालेला निर्णय कायम ठेवावा. तरीही जर अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे वित्तीय अधिकार कमी करावयाचे असतील तर वसुंधरा कार्यालयाकडून कारणमीमांसेसह प्रस्ताव सादर करणेत यावा. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | उपरोक्त बदलासह दि.३१ मे, २०२३ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | | |
| २ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत माहे एप्रिल २०२३ पासून घ्यावयाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नेमणुकी बाबत व मानधन अदायगीबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत माहे एप्रिल २०२३ पासून घ्यावयाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नेमणुकी बाबत व मानधन अदायगी बाबत शासन स्तरावरून सेवा पुरवठादार संस्थेची नेमणूक याबाबत चर्चा करण्यात आली. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत माहे एप्रिल २०२३ पासून घ्यावयाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीबाबत व मानधन अदायगीबाबत शासन स्तरावरून सेवा पुरवठादार संस्थेची नेमणूक झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. | मृद व जलसंधारण विभाग व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |
| ३ | कलमे / रोपे तयार करण्याच्या | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत संचालक फलोत्पादन कार्यालयामार्फत कलमे / रोपे | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत संचालक फलोत्पादन कार्यालयामार्फत कलमे / रोपे | वसुंधरा पाणलोट | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | दि.१४.०७.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांना मान्यता देण्याबाबत चर्चा करण्यात आली. | दि.१४.०७.२०२३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांना सोबत जोडलेल्या परिशिष्ठ "अ" व "ब" प्रमाणे समितीने कार्योत्तर मान्यता दिली. | | |
| ४ | सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी प्रती हेक्टर खर्चाच्या मापदंडांना मान्यता देणे. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत अशासकीय संस्थाद्वारा व शासकीय संस्थाद्वारा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रती हेक्टरी खर्चाच्या मापदंडाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत अशासकीय संस्थाद्वारा व शासकीय संस्थाद्वारा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रती हेक्टरी खर्चाच्या मापदंडाना सोबत जोडलेल्या परिशिष्ठ "क" प्रमाणे मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |
| ५ | फळबाग लागवडीचे तांत्रिक व आर्थिक मापदंड भाऊसाहेब फुंडकर लागवड योजने ऐवजी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन NRM या घटकांतर्गत फळबाग लागवडीकरिता मग्रारोहयो योजनेच्या पात्रता निकषानुसार पात्र असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर मग्रारोहयो योजनेअंतर्गत लागवड करावी व मग्रारोहयो योजनेच्या पात्रता | मग्रारोहयो योजनेच्या पात्रता निकषानुसार पात्र शेतकऱ्यांच्या शेतावर मग्रारोहयोच्या निधीमधून फळबाग लागवड करावी व जे शेतकरी मग्रारोहयो योजनेंतर्गत पात्र नसतील त्यांनी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या मापदंडाऐवजी मग्रारोहयो योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व पीकांची लागवड | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | मापदंड वापरण्यास मान्यता देणे. | निकषांप्रमाणे पात्र नसलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या धर्तीवर प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मधील NRM (४७%) निधीमधून लागवड करण्याच्या सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. तथापि, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये काही पीकांचा समावेश नाही. यामुळे मग्रारोहयो योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या सर्व पीकांच्या लागवडीसाठी मग्रारोहयोचे तांत्रिक व आर्थिक मापदंड वापरुन लागवड करण्यास मान्यता मिळण्याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन मागणी होत आहे. | मग्रारोहयोचे फळबाग लागवडीचे तांत्रिक व आर्थिक मापदंड वापरुन प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत NRM करीताच्या ४७% तरतुदीमधून लागवड करण्यास मान्यता देण्यात आली. | | |
| ६ | फळबाग लागवडीसाठी अपवादात्मक परिस्थितीमध्ये खाजगी मान्यता प्राप्त रोपवटीकेमधून कलमे / | काही ठिकाणी फळबाग लागवडी करीता लागणारी कलमे / रोपे प्रकल्प क्षेत्रातील शासकिय फळ रोपवाटिकेमध्ये, तसेच जिल्हयातील शासकिय फळ रोपवाटिकेमध्ये उपलब्ध नसल्याने सदरची कलमे / रोपे खरेदी | DBT तत्वावर शेतकऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार शासकीय किंवा शासन मान्यता प्राप्त खाजगी रोपवाटिकेतून कलमे / रोपे घेण्याची परवानगी देणेबाबत समितीने मान्यता दिली. शासकीय रोपवाटिकेतून कलमे / रोपे घेतल्यास त्याचा | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व संचालक, | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | रोपे उचलण्यास मान्यता देणे. | करण्याबाबत मार्गदर्शन होणेबाबत क्षेत्रिय स्तरावरून विचारणा होत आहे. त्यामुळे प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये समाविष्ट फळबाग लागवडीकरीता आवश्यक कलमे / रोपे प्रकल्पाच्या क्षेत्रातील शासकिय फळ रोपवाटिकेमध्ये अथवा जिल्हयातील शासकिय फळ रोपवाटिकेमध्ये उपलब्ध नसल्यास, सदरची कलमे / रोपे उपलब्धतेबाबत पुढील प्रमाणे प्राधान्यक्रम असावा. १) प्रकल्प क्षेत्रातील शासकीय फळ रोपवाटिका २) प्रकल्प ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्यातील शासकीय फळ रोपवाटिका ३) जिल्ह्यातील कृषि विद्यापीठाच्या फळ रोपवाटिका ४) प्रकल्प क्षेत्रातील शासन मान्यता असलेल्या खाजगी फळ रोपवाटिकेमधुन खरेदी करण्यास मान्यता देण्याबाबत चर्चा झाली. | खर्च यापूर्वी संचालक, फलोत्पादन यांचेकडे देण्यात आलेल्या अग्रीम निधीमधून समायोजित करण्यात यावा व शासनमान्य खाजगी रोपवाटिकेतून कलमे / रोपे घेतल्यास सदर बाबीचा खर्च पाणलोट समिती स्तरावरील नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन घटकातून इतर घटकाप्रमाणे PFMS द्वारे करण्यास मान्यता देणेत आली. | फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे | |
| ७ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट | भंडारा जिल्ह्यातील प्रकल्प क्र.PMKSY- WDC २.० /०१ मध्ये प्राथमिक प्रकल्प अहवालानुसार | भंडारा जिल्ह्यातील प्रकल्प क्र.PMKSY- WDC २.० /०१ मध्ये १२२१.४६ हेक्टर क्षेत्र व प्रकल्प | वसुंधरा पाणलोट | ७ दिवस |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | विकास घटक-२.० अंतर्गत भंडारा जिल्हयातील प्रकल्पांचे उपचार क्षेत्र २५०० हेक्टर पेक्षा कमी होत असल्याने संबंधित जिल्हयाने सादर केलेला प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेसाठी मान्यता देणेबाबत. | ३९१५.८४ हेक्टर उपचार क्षेत्र मंजूर आहे. तथापि, सिंचनाखाली येणारे १४७९.३८ हेक्टर व अतिघनदाट वनक्षेत्रामुळे उपचारास अयोग्य असणारे १२६५.४६ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पामधून कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे फक्त १२२१.४६ हेक्टर क्षेत्र उपचारासाठी शिल्लक रहात आहे. तसेच, प्रकल्प क्र.PMKSY-WDC२.० /०२ मध्ये प्राथमिक प्रकल्प अंहवालानुसार ४२६३.२५ हेक्टर उपचार क्षेत्र मंजूर आहे. तथापि, सिंचनाखाली येणारे २०४२.५३ हेक्टर व अतिघनदाट वनक्षेत्रामुळे उपचारास अयोग्य असणारे ९२४.७२ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पामधून कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे फक्त १२९६.०० हेक्टर क्षेत्र शिल्लक रहात आहे. केंद्र शासनाच्या सूचंनानुसार प्रकल्प उपचार क्षेत्र कमीत कमी २५०० हे. असणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या दि.४/१/२०२२ रोजीच्या सुकाणू समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील सूचनांमध्ये पुढील | क्र.PMKSY- WDC२.० /०२ मध्ये १२९६.०० हेक्टर क्षेत्र शिल्लक रहात आहे. केंद्र शासनाच्या दि.४/१/२०२२ रोजीच्या सुकाणू समितीच्या इतिवृत्तातील सूचनांनुसार क्षेत्र कमी झालेल्या प्रकल्पांची सविस्तर तपशिलासह परिशिष्ट “ड“ प्रमाणे केंद्र शासनास नोट (Note) सादर करण्यास मान्यता देण्यात आली. | विकास यंत्रणा, पुणे | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे. "However, in exceptional cases projects with area not less than १००० ha may be allowed with detailed justification note submitted by the State concerned to DoLR." त्यानुसार क्षेत्र कमी झालेल्या प्रकल्पांची सविस्तर तपशिलासह केंद्र शासनास नोट (Note) सादर करणेबाबत चर्चा करण्यात आली. | | | |
| ८ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य, जिल्हा, प्रकल्प स्तरावर करावयाच्या प्रशासकीय निधी वितरणाच्या प्रमाणाबाबत. | प्रशासकीय निधी हा प्रत्यक्ष त्रैमासिक प्रकल्प खर्चाच्या आधारावर राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावर वितरीत करणेबाबत विषय सादर करण्यात आला. | १०% प्रशासकीय निधी हा प्रकल्पाच्या त्रैमासिक खर्चाच्या आधारावर राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावर वितरीत करणेस खालील प्रमाणे मान्यता देणेत आली :-<br>१) राज्यस्तर १%<br>२) जिल्हास्तर ०.५%<br>३) प्रकल्पस्तर ५.५%<br>४) पाणलोट समितीस्तर ३% | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ९ | प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO) स्थापन करणेकरिता आत्मा या संस्थेमार्फत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचंनांना कार्योत्तर मान्यता घेणेबाबत. | प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक संघ / कंपनी (FPO) स्थापन करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मृद व जलसंधारण विभाग, शासन पत्र क्र.प्रकृयो-२०२३/ प्र.क्र.५१/जल-८, ०१/०६/२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर मार्गदर्शक सूचना समितीसमोर कार्योत्तर मान्यतेकरिता सादर करण्यात आल्या. | प्रवेश प्रेरक उपक्रमांतर्गत शेतकरी उत्पादक संघ / कंपनी (FPO) स्थापन करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मृद व जलसंधारण विभाग, शासन पत्र क्र.प्रकृयो-२०२३/ प्र.क्र.५१/जल-८, ०१/०६/२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर सदर मार्गदर्शक सूचनांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट "इ" नुसार मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे | |
| १० | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांचे मदतीने राबविणेबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांचे मदतीने राबविण्यास मा.सहसचिव, DOLR, GOI यांनी दि.२८.०६.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने या संदर्भात माहिती घेणेकरिता वसुंधरा कार्यालयातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी उपजीविका व प्रशासन | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका उपजीविका हा घटक MSRLM च्या मदतीने व त्यांच्या आर्थिक मापदंडानुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली. या संदर्भात सविस्तर मार्गदर्शक सुचना वसुंधरा कार्यालय व MSRLM यांनी एकत्र चर्चा करून तयार कराव्यात अशा सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या. त्यानंतर या सुचनांना मुख्य कार्यकारी | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व MSRLM | १५ दिवस |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | अधिकारी यांनी दि.२३.०७.२०२३ व दि.२४.०७.२०२३ रोजी जयपुर, राजस्थान येथील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या कार्यालयास भेट देवून राजस्थान राज्यात उपजीविका घटकाची करण्यात येत असलेल्या अंमलबजावणीची माहिती घेतली व त्यासाठीची यंत्रणा, त्यासाठीचे आर्थिक मापदंड, त्याअनुषंगाने तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व त्यांची मान्यता, इत्यादीबाबत संचालक व सहमुख्य कार्यकारी अधिकारी (उपजीविका), राज्यस्तरीय नोडल यंत्रणा, राजस्थान यांचेशी सविस्तर चर्चा केली. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील MSRLM च्या मदतीने PMKSY WDC २.० मधील उपजीविका हा घटक राबविणे बाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. | अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी मान्यता देवून उपजीविका घटकाची अमलबजावणी सुरू करावी व त्यानंतर पूढील SLNA च्या बैठकीत कार्योत्तर मान्यता घ्यावी असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ११ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) यांनी करावयाच्या प्रशिक्षण नियोजनाबाबत. | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) ही संस्था प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असून संस्थात्मक बांधणी व क्षमता बांधणी घटकांतर्गत रु.३२ कोटी निधी संस्थेस वितरित केला आहे. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा , पुणे व जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) यांच्या दरम्यान झालेल्या करारनाम्यानुसार संस्थेने या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने विविध स्तरावरील प्रशिक्षणाचे नियोजन व आयोजन तसेच या योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी काम करणे अपेक्षित आहे. विविध स्तरावरील प्रशिक्षणाचे नियोजन करीत असताना संस्थेने योजनेशी संबंधित विविध भागधारकांसाठी पूर्व तयारी टप्पा (preparatory phase), कामे सुरू असतानाचा टप्पा (work phase) व योजनेचा | वाल्मी या संस्थेने सादर केलेल्या प्रशिक्षण मोड्यूलची तपासणी करुन वसुंधरा यंत्रणेने त्यास मान्यता द्यावी व वाल्मी संस्थेने प्रशिक्षणाकरिता वितरित केलेला निधी खर्च करण्याच्या दृष्टीने तात्काळ प्रशिक्षणाचे नियोजन करून प्रशिक्षण सुरू करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) | ७ दिवस |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | अंतिम टप्पा (exit protocol) अशा विविध टप्प्यातील प्रशिक्षणाचे नियोजन करून कोणकोणती प्रशिक्षणे घ्यावयाची आहेत ते निश्चित करणे अपेक्षित आहे. या प्रशिक्षणाबाबतच्या भाग धारकांच्या प्रशिक्षण गरजा जाणून घेऊन त्या नुसार प्रशिक्षण मोड्यूल तयार होणे अपेक्षित आहे. यावर वाल्मी संस्थेचे प्रतिनिधी डॉ. बोडखे यांनी प्रशिक्षण मोड्यूल वसुंधरा यंत्रणेकडे सादर केले असून त्यास मान्यता प्रतिक्षाधीन असल्याचे सांगितले. त्यासंदर्भात प्रशिक्षण मोड्यूलला वसुंधराने मान्यता न दिल्याबद्दल व याबाबतचे नियोजन आणि खर्च अत्यंत नगण्य असलेबाबत मा.अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे. | | | |
| १२ | PIA, DRO, PTO, LRA, DPR छाननी निकषांना मान्यता घेणेबाबत | प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना -पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA), जिल्हा संसाधन संस्था (DRO), | प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना -पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA), जिल्हा संसाधन संस्था (DRO), | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व | १ महिना |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA), सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (DPR) यासाठी स्वयंसेवी / शासकीय / बिगर शासकीय संस्थांची निवड सूची राज्यस्तरावर तयार करण्यासाठी जुलै २०२२ मध्ये मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या स्तरावरून जाहिरात देण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार विहित नमुन्यातील अर्जासोबत अर्जदारांना पुरविण्यात आलेले निकष हेच कायम करण्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>समितीतील सदस्य ॲड. अमित गीते यांनी जाहिरातीत नमूद केलेनुसार वसुंधरा कार्यालयातून संस्थांना वितरित केलेल्या अर्जासोबत जे पात्रता निकष जोडण्यात आले होते तेच कायम ठेवून प्रस्तावांची छाननी करण्यात यावी, अशी सूचना केली. | प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO), उपजीविका संसाधन यंत्रणा (LRA), सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (DPR) यासाठी स्वयंसेवी / शासकीय / बिगर शासकीय संस्थांची निवड सूची राज्यस्तरावर तयार करण्यासंदर्भातील निकषांना परिशिष्ट फ१-PTO, फ२-DRO, फ३-LRA, फ४-PIA, फ५-DPR प्रमाणे मान्यता देणेत आली. | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १३ | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेनुसार आयत्या वेळेचे विषय.<br>१. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कार्यरत अधिकाऱ्याच्या विमान प्रवासास मान्यता देणेबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजने अंतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्याबाहेर अथवा राज्यात योजनेचे कामकाज करताना करावा लागणारा दौऱ्यात विमान प्रवास करण्यास मान्यता देण्याबाबत प्राधिकार ठरविण्यास प्रस्तावित करण्यात आले. | याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय क्र.प्रवास-१०२२/प्र.क्र.११/सेवा-५, दि.१६.१२.२०२२ मधील तरतुदीनुसार मा.प्रधान सचिव स्तरावरून मान्यता घेण्यात यावी, असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |
| | २. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजने अंतर्गत | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजने अंतर्गत उत्पादन पद्धती या घटकाच्या संचालक, आत्मा यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सुचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये शेतकरी उत्पादक संघ / कंपनी यांनी तयार केलेल्या | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजने अंतर्गत उत्पादन पद्धती या घटकाच्या संचालक, आत्मा यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सुचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये शेतकरी उत्पादक संघ / कंपनी यांनी तयार केलेल्या | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व संचालक, | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | उत्पादन पद्धती या घटकाच्या संचालक, आत्मा यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सुचनांना मान्यता देणेबाबत. | उपप्रकल्पासाठी प्रकल्प किमतीच्या ६०% किंवा जास्तीत जास्त १ कोटीच्या मर्यादेत निधी अनुदान स्वरुपात देणेत यावा याबाबत चर्चा झाली. | उपप्रकल्पासाठी प्रकल्प किमतीच्या ६०% किंवा जास्तीत जास्त १ कोटीच्या मर्यादेत निधी अनुदान स्वरुपात देणेत यावा, असा बदल सुचंनांमध्ये करणेत यावा, असे अध्यक्षांनी सुचविले. उपरोक्त बदलासह संचालक, आत्मा यांनी तयार केलेल्या उत्पादन पद्धतीच्या मार्गदर्शक सुचनांना मान्यता देणेत आली. | आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे | |

वरील प्रमाणे सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

(वि.बा. नाथ)
सदस्य सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

(एकनाथ डवले)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा प्रधान सचिव,
मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई